जावक क्र. 2061/2021
सावंतवाडी पोलीस ठाणे
दि. 6/04/2021

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
**प्रथम खबर अहवाल**
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** सिंधुदुर्ग **P.S.(ठाणे):** सावंतवाडी **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0062 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/04/2021 02:08 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 (सुधारित 2018) प्रमाणे |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 05/04/2021

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 05/04/2021

**Time From (वेळेपासून):** 15:35 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:35 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 06/04/2021 **Time (वेळ):** 01:55 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 002 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/04/2021 01:55 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** तहसिलदार कार्यालय, सावंतवाडी,सावंतवाडी

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** निशा आनंद टोपले

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1973 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | खालचा बाजार,साटेली भेडशी ,दोडामार्ग,दोड्डामार्ग,सिंधुदुर्ग,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | खालचा बाजार,साटेली भेडशी ,दोडामार्ग,दोड्डामार्ग,सिंधुदुर्ग,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.): 91-9403297634**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पुरूषात्तम कष्णा वारंग | | | 1. आनंदवन अपार्टमेंट,सालईवाडा, सावंतवाडी,सावंतवाडी ,सावंतवाडी, सिंधुदुर्ग,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रू. दराच्या 8 चलनी नोटा | 4,000.00 |
| 2 | इतर | संकीर्ण/विविध | एक जुनी वापरती गड्द तप्कीरी रंगाची फुल पॅंट | 100.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 4,100.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी निशा आनंद टोपले, वय 48 वर्शे, व्यवसाय-आईसक्रिम फक्टरी, राह. साटेली-भेडशी, खालचा बाजार, ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग, मोबाईल क्र. 9403297634 समक्ष लिहुन देते की, माझे राहते घर वरील ठिकाणी असुन, तेथे मी माझे कुटुंबासह राहते. माझे पती श्री. आनंद प्रेमानंद टोपले, यांनी मंगल कार्पोरेशन, बोरीवली, या वित्तीय कंपनीमध्ये वैयक्तीक कामाकरीता माहे फेब्रुवारी 2020 मध्ये प्रॉपर्टी तारण कर्ज प्रकरण केले होते. सदर कर्ज प्रकरणामध्ये कंपनीस जामीनदार यांचा ऐपतीचा दाखला (सॉल्वन्सी सर्टीफिकेट) आवश्यक असल्याने जामीनदार श्री. संतोष बाबाजी राणे, रा. दोडामार्ग यांनी त्यांचे मालकीची जमिन गाव मौजे इन्सुली, ता. सावंतवाडी येथे असल्याने सावंतवाडी तहसिलदार कार्यालयामध्ये माहे मार्च 2021 मध्ये ऐपतीचा दाखला मिळणेकरीता विनंती अर्ज केलेला होता. तसेच त्या अर्जाचे अनुषंगाने तहसीलदार कार्यालय सावंतवाडी येथे पाठपुरावा करणे तसेच अन्य कामाकरीता मला अधिकार पत्र दिले होते. त्या अनुषंगाने मी व माझे पती श्री. टोपले असे दि. 01/04/2021 रोजी तहसीलदार कार्यालय सावंतवाडी, येथे येवून संबंधीत लिपीक श्री. वारंग यांची भेट घेतली. त्यावेळी श्री. वारंग यांनी मला बाहेर थांबण्यास सांगुन माझे पती श्री. आनंद टोपले यांना जामिनदार श्री.राणे यांचा ऐपतीचा दाखला देणेकरीता 4000/- रू. घेवून संध्याकाळी भेटण्यास बोलावले. तेव्हा मी, माझे पती श्री. टोपले यांना लिपीक श्री. वारंग यांना पैसे द्यावयाची गरज नाही आपण जामिनदार श्री. राणे यांचेशी बोलुन घेवू असे सांगितले. त्यानंतर आम्ही श्री. राणे यांची भेट घेवून सदरची बाब सांगीतली. आम्हास श्री.वारंग यांना सदर प्रकरणामध्ये पैसे द्यावयाचे नसल्याने अँन्टी करप्शन विभागाकडे त्यांची तक्रार करण्याचा निर्णय घेतला. मी दिनांक 05/04/2021 रोजी माझे परिचयाचे अँन्टी करप्शन विभागाचे पोलीस निरीक्षक श्री. कुंभार यांचेशी संपर्क साधुन, माझी लोकसेवक श्री. वारंग यांचेविरूध्द वरीलप्रमाणे लाचेच्या मागणीची तक्रार असल्याचे सांगितले. तेव्हा पोलीस निरीक्षक श्री.कुंभार यांनी मला सावंतवाडी गार्डन येथे सकाळी 11.30 वा.पर्यंत येण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे सकाळी 11.30 वा. सावंतवाडी गार्डन येथे आले व पो.नि.श्री.कुंभार यांची भेट घेतली. त्यावेळी पो.नि.श्री. कुंभार यांनी सापळा पथकातील पंच साक्षिदार व पोलीस अधिकारी व अंमलदार यांची ओळख करुन दिली. त्यांनतर पो.नि.श्री.कुंभार यांचे सुचनेवरुन स्वहस्ताक्षरात तक्रार लिहुन दिली. त्यानंतर पो.नि.श्री.कुंभार यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी स्वहस्ताक्षरातील तक्रार वाचुन त्यावर सहया केल्या. त्यानंतर पोनि/कुंभार यांनी माझे लेखी तक्रारीवर सही करुन सदरची तक्रार आपल्या ताब्यात घेतली. पोनि/कुंभार यांनी लोकसेवक श्री. वारंग, लिपीक यांची तहसीलदार कार्यालय, सावंतवाडी येथे लाचेच्या मागणीची पडताळणी करून त्यावेळी लोकसेवक वारंग व माझेत होणारे संभाषण डिजीटल व्हाईस रेकर्डरद्वारे ध्वनीमुद्रीत होणार असल्याचे सांगितले. पोनि/कुंभार यांनी पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने

मला तसेच पंचाना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोना/पालकर यांनी आंम्हास मेमरी कार्ड व व्हईस रेकर्डरचे प्रात्यक्षीक दाखवले. त्यानंतर सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करून श्री. वारंग, लिपीक यांची तहसीलदार कार्यालय, सावंतवाडी येथे लाचेच्या मागणीची पडताळणी करणेकरीता, मी व पंच क्रमांक 1 श्री.राणे असे पंच क्रमांक 1 श्री.राणे यांचे स्विफ्ट डिझायर गाडी क्रमांक एम.एच.02/बीएम-2862 ने तहसीलदार कार्यालय, सावंतवाडी येथे जावुन लिपीक श्री. वारंग यांची भेट घेतली. त्यांना मी माझी ओळख सांगुन जामीनदार श्री.राणे यांचे ऐपत दाखल्याची मागणी केली असता, त्यांनी दाखल्यावर साहेबांची सही झालेली नाही. दुपारपर्यंत सही होईल असे सांगुन, 8 लाखाचे प्रकरण होत नव्हते मी ते माझे लेवलवर केले. त्यादिवशी मी तुमच्या मिस्टरांना सांगीतले होते असे मला म्हणाले असता, मी त्यांना मिस्टरांनी मला काही सांगीतलेले नाही असे सांगीतले. तेव्हा श्री.वारंग यांनी 4 असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना 4 खुप होतात. काही तरी कमी करा असे सांगीतले असता, त्यांनी 4 मध्ये काही कमी नाही होणार असे म्हणुन 4,000/- रुपयांची लाचेची मागणी केली. त्यावेळी मी माझी पर्स उघडली असता, श्री.वारंग यांनी बाहेर जावुन काढुन आणा असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना इतके पैसे आता नाही आहेत. एटीएम मधुन काढुन घेवुन येते असे सांगीतले असता,ठिक आहे या दुपारी 2.30 ते 3.00 वा.पर्यंत असे म्हणाले असल्याचे डिजीटल व्हाईस रेकर्डरमधील मेमरी कार्डवर ध्वनीमुद्रीत झाले असल्याचे आढळुन आले. पोनि/कुंभार यांनी मला घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता मी त्यांना वरीलप्रमाणे घडलेली हकीगत संगितली. त्या अनुषंगाने पोनि/कुंभार व पंचांनी डिजीटल व्हईस रेकर्डरमधील ध्वनीमुद्रीत झालेले माझे व लोकसेवक यांचेत झालेले संभाषण पंचासमक्ष ऐकले असता, लोकसेवक श्री. वारंग, लिपीक, तहसीलदार कार्यालय, सावंतवाडी यांनी जामीनदार श्री.संतोष राणे यांचा ऐपत दाखला देणेकरीता 4,000/- रुपयांची लाचेची मागणी केली असल्याचे आढळुन आल्याने लोकसेवक श्री. वारंग यांचेविरूध्द दिनांक 05/04/2021 रोजी तहसीलदार कार्यालय सावंतवाडी येथे लाचेचा सापळा आजमाविण्याचे पोनि/कुंभार यांनी निश्चित केले. त्यानंतर पोनि/कुंभार यांनी फिगो वाहनातच नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावणे, नोटा स्कन करणे . सापळा पुर्व पंचनाम्याची कार्यवाही पुर्ण केली. त्यानंतर सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करून लोकसेवक वारंग यांचेविरूध्द तहसीलदार कार्यालय सावंतवाडी येथे लाचेचा सापळा आयोजीत केला.लोकसेवक वारंग यांनी मागणी केलेली लाच रक्कम रुपये 4,000/- त्यांना देणेकरीता मी व पंच क्रमांक 1 श्री. राणे असे पंच क्रमांक 1 श्री.राणे यांचे स्विफ्ट डिझायर गाडी क्रमांक एम.एच. 02/बीएम-2862 ने तसेच सापळा पथक पोनि/कुंभार यांचे फिगो वाहनाने सावंतवाडी तहसीलदार कार्यालयाकडे जाणेस निघालो. तहसीलदार सावंतवाडी कार्यालयाच्या आवारामध्ये स्विफ्ट डिझायर गाडी पार्क करुन गाडी मधुन खाली उतरुन पायी चालत चालत तहसीलदार सावंतवाडी कार्यालयामध्ये आलो. मी व पंच क्र.1 श्री.राणे असे सामान्य शाखेमध्ये गेलो असता, श्री.वारंग कार्यालयात नसल्याचे दिसुन आले म्हणुन तेथे विचारपुस केली असता, श्री.वारंग हे जेवण करणेकरीता बाहेर गेले असल्याचे समजले. त्या वरुन मी व पंच असे सामान्य शाखेमधुन बाहेर येवुन तेथेच असलेल्या खुर्चीवर बसुन श्री.वारंग यांची वाट पहात बसलो. काही वेळाने श्री.वारंग व त्यांचे सोबत एक पोलीस असे एकमेकांशी बोलत बोलत सामान्य शाखेमध्ये गेले. त्यांचे पाठोपोठ मी व पंच क्रमांक 1 श्री.राणे असे त्यांचे टेबलाजवळ गेलो. श्री.वारंग यांनी पोलीसांचे काम केले. त्यांतनर तेथुन पोलीस निघुन गेल्यानंतर, श्री.वारंग यांनी आम्हास थोडावेळ थांबण्यास सांगीतले. त्याप्रमाणे आम्ही बाहेर थांबलो. त्यानंतर काही वेळाने श्री.वारंग यांनी आम्हाला हाताच्या इशा-याने आत बोलावीले. त्यावरुन आम्ही आत गेलो असता, श्री.वारंग यांनी मला दाखला दिला व हाताच्या इशा-याने माझेकडे पैशांची मागणी केली. त्यावेळी मी माझे पर्समधील लाचेची रक्कम उजव्या हाताने काढुन श्री.वारंग यांचे समोर धरली असता,श्री.वारंग यांनी लाचेची रक्कम आपल्या डाव्या हाताने स्विकारुन, परीधान केलेल्या फुलपन्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर सामान्य शाखेमधुन बाहेर येवुन सापळा पथकास दिसेल या पध्दतीने माझे डोळ्यावरील चष्मा काढुन पुर्व नियोजीत इशारा केला असता पोनि/कुंभार व सापळा पथकाने लोकसेवक वारंग यांना लाच रक्कम रु. 4000/- सह 15.35 वा. तहसीलदार कार्यालय सावंतवाडी इमारतीमधील तलाठी शहर/ग्रामिण असा बोर्ड असलेल्या दरवाज्यावर रंगेहाथ पकडण्यात आलेले आहे. पोनि/कुंभार यांनी त्यांचेकडे नावा गावाची विचारपुस केली असता, त्यांनी आपले नाव पुरूषोत्तम कृष्णा वारंग, वय वर्षे 52, कनिष्ठ लिपीक, तहसीलदार कार्यालय सावंतवाडी, ता. सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग, राह.आनंदवन अपार्टमेंट, रूम नं. 07, सालईवाडा, सावंतवाडी, ता. सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग, मुळ राह. वारंगांची तुळसुली, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग असे असल्याचे सांगीतले. माझे तक्रारीचे अनुषंगाने पोनि/कुंभार यांनी दोन पंचासमवेत दिनांक 05/04/2021 रोजीच्या पडताळणी व सापळा कारवाईचा सविस्तरपणे पंचनामा केलेला आहे. अशा रितीने, लोकसेवक पुरूषोत्तम कृशणा वारंग, वय वर्षे 52, कनिष्ठ लिपीक, तहसीलदार कार्यालय सावंतवाडी, ता. सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग, राह. आनंदवन अपार्टमेंट, रूम नं. 07, सालईवाडा, सावंतवाडी, ता. सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग, मुळ राह. वारंगांची तुळसुली, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग यांनी माझे पती श्री. आनंद प्रेमानंद टोपले, यांचे मंगल कार्पोरेशन, बोरीवली, या वित्तीय कंपनीमधील तारण कर्जाकरीता असलेले जामिनदार श्री. संतोष बाबाजी राणे, राह. सुरूचीवाडी, दोडामार्ग यांचा ऐपतीचा दाखला देणेकरीता माझेकडे 4000/- रू. लाचेची मागणी करून सदरची लाच रक्कम रू. 4000/- दिनांक 05/04/2021 रोजी दुपारी घेवून येण्यास सांगुन सदरची लाच रक्कम रू. 4000/- पंचासमक्ष स्विकारल्याने, माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Shashikant Nivrutti Khot(I (Inspector)) / PI **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Shashikant Nivrutti Khot

**Rank**(पद): (Inspector)

**No.**(सं.): PI

पोलीस स्टेशन ऑफीसर
सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**